# 'एनआयई'तर्फे सहलीच्या माध्यमातून शिक्षण

म. टा. प्रतिनिधी, मुंबई



लोणावळ्याच्या टाटा पॉवर महाशीर हॅचरीमध्ये महाशीर या दुर्मिळ माशाचे संवर्धन करण्याचा प्रयत्न होत आहे. या माशाबद्दल नागरिकांना माहिती व्हावी, यासाठी 'टाइम्स न्यूजपेपर इन एज्युकेशन' (एनआयई) आणि टाटा पॉवरच्या वतीने नुकतेच शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी धमाल-मस्ती करत ज्ञान मिळवले.

जमिनीचा वापर, नद्यांचा पात्रबदल, पाण्याच्या पातळीत झालेला बदल, शेतीमध्ये वाढलेले कीटकनाशकांचे प्रमाण, नदीपात्रात होणारे प्रदूषण यामुळे या माशांवर विपरित परिणाम झाला आहे, अशी माहिती टाटा पॉवरच्या जैवविविधता विभागाचे प्रमुख विवेक विश्वासराव यांनी दिली. हा मासा गोड्या पाण्यात आढळतो. प्रामुख्याने पुणे-लोणावळा पट्ट्यात मुळा-मुठा नद्या, इंद्रायणीच्या पात्रात हा मासा आढळतो. १९७०मध्ये महाशीर संवर्धन प्रकल्पाला सुरुवात झाली. अंडी उबवून दरवर्षी चार ते पाच लाख माशांची पैदास केली जाते. देशभरात हा मासा कुठे आहे, याची माहिती ठेवली जाते. टाटा पॉवर या माशांच्या पिल्लांना संबंधित राज्याच्या मत्स्य विभागातर्फे त्या राज्यात पाठवते, अशीही माहिती विश्वासराव यांनी दिली.

मुंबई आणि आजूबाजूच्या परिसरातील शाळांमधील काही विद्यार्थ्यांनी पर्यावरण संतुलनासाठी आवश्यक असलेल्या गोष्टींबाबत चर्चा केली. महाशीर माशानेसुद्धा आजूबाजूच्या पर्यावरणाशी जुळवून घेत प्रतिकूल परिस्थितीवर मात केली आहे. त्यामुळे या माशाचे प्रमाण हळूहळू वाढत आहे. महाशीर संवर्धन कार्यक्रमातून हा मासा पूर्वीसारखाच सर्व ठिकाणी उपलब्ध होईल, असा विश्वास महाशीर संवर्धन केंद्राच्या वतीने व्यक्त करण्यात आला.

या ज्ञानवर्धक अनुभवानंतर स्नेहील सारंही या दहावीच्या विद्यार्थिनीने ही शैक्षणिक सहल डोळ्यात अंजन घालणारी ठरल्याची प्रतिक्रिया दिली. तिने 'एनआयई'चे आभार मानले. या उपक्रमाचे शिक्षकांनीसुद्धा भरभरून कौतुक केले.